15

# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे

नविन मध्यवर्ती इमारत, ३ रा मजला, पुणे
Ph No- ०२०- २६१२६६२८/२६१२३९८५ Fax- ०२०- २६१२७००४
Gmail- dirmktms@gmail.com Website- mahapanan.maharashtra.gov.in

जा.क्र.पणन-५/कृउबास/गुरांचा बाजार भत्ता दरवाढ / २०२० / 2386 / दिनांक: ८ /०७/ २०२०

प्रति,
१. जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, (सर्व)
२. सभापती/ सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व )

**विषय - महाराष्ट्रातील कृषि उत्पन्न बाजार समिती कर्मच-यांना लागु असणा-या गुरांच्या बाजार भत्ता दरामध्ये वाढ होणेबाबत.**

संदर्भ - अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाजार समिती कर्मचारी संघ ,पुणे यांचेकडील दि.०३.२.२०१९, १२.०३.२०१९ , दि.१४.०८.२०१९ ,दि.२३.१०.२०१९, दि.०८.०१.२०२० व दि.२१.०५.२०२० चे पत्रे.

उपरोक्त विषयाचे या कार्यालयास वरील संदर्भिय पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

संदर्भिय पत्राचे अनुषंगाने वरील विषयाबाबत या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावास अनुसरुन बाजार समितीच्या कर्मचा-यांना गुंराचा बाजार भत्ता दरा बाबत बाजार समित्यांना कर्मचारी प्रकार व बाजार समिती वर्ग या प्रमाणे खालील -अटीस अधिन राहून खालील दर्शविलेले सुधारीत दर मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचारी प्रकार | बाजार समिती वर्ग | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड |
| १ | सचिव | रू. ६०० | रू. ५०० | रू. ४०० | रू. ३०० |
| २. | सह,उप, अप्पर, सहाय्यक सचिव व लेखापाल | रू. ५०० | रू. ४०० | रू. ३०० | रू. २०० |
| ३. | इतर कर्मचारी | रू. ४०० | रू. ३०० | रू. २०० | रू. १५० |

**अटी व शर्ती :-**

१. ज्या बाजार समित्यांनी गुरांच्या बाजाराचा ठेका दिला असेल,अशा बाजार समित्यामध्ये हा भत्ता देता येणार नाही.
२. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात गुरांचा बाजार कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी भरत असेल तरच सदरचा भत्ता अनुज्ञेय राहील.
३. इतर दिवशी कार्यालयीन वेळेपेक्षा जास्त वेळ आणि महिन्यातून दोन किंवा अधिक वेळा भरत असेल तरच गुरांचा बाजार भत्ता अनुज्ञेय असेल.
४. इतर कर्मचारी जे प्रत्यक्ष गुरांचे बाजारात किंवा गुरांचे बाजार सबंधी कामकाज करीत असतील त्याच

Scanned by CamScanner

कर्मचा-यांना गुरांच्या बाजार भत्ता अनुज्ञेय राहील.

५. वाढीव भत्ता दि.०१/०७/२०२० पासून लागू राहील. बाजार समित्यांनी कायदयातील तरतूदीप्रमाणे सेवा नियमात दुरुस्ती करुन घ्यावी, सेवा नियमातील दुरुस्ती मंजूरी नंतरच सदर दर लागू राहतील.

६. ज्या बाजार समितीमध्ये गुरांचा बाजार भरविला जातो अशा बाजार समितीच्या कर्मचा-यांना वरील नमूद बाजार भत्यामध्ये दरवषी १०% वाढ करता येईल.

( सतिश सोनी )
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत- माहिती व पुढील योग्य त्या कर्यवाहीस्तव रवाना.**

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२. श्री .दिलीप ल. डेबरे, अध्यक्ष , महाराष्ट्र राज्य बाजार समिती कर्मचारी संघ, पुणे

Scanned by CamScanner